ISSN 2231-1629
Knowledge Resonance

**IMPACT FACTOR 8.072**

January-June 2022- Vol. 11 No. 1

# मराठवाडा मुक्ती संग्रामातील विविध नेत्यांचे योगदान

**प्रा. डॉ. सुषमा देशपांडे**

*इतिहास व विभागप्रमुख*

*इतिहास संशोधक*

*डॉ. सौ. इं. भा. पा. महिला महाविद्यालय, औरंगाबाद.*

भारताच्या स्वातंत्र्यानंतर एक वर्ष एक महिन्यानंतर मराठवाडा स्वतंत्र झाला. हा लढा झाला नसता तर भारतीय स्वातंत्र्य अपुरे राहिले असते. हैदराबाद मुक्तिसंग्राम हा अनियंत्रित राज्यसत्ता व लोकशाही यांच्यातील तीव्र संघर्ष होता धर्मांध रजाकार संघटना व निझामाने केलेले १९२१ व १९२९ सालचे गश्ती मिशन ५२ व ५३ या कायद्यान्वये नागरिकांच्या स्वातंत्र्यावर बंधने होती, या कायद्यान्वये सभा संमेलने भाषणे सार्वजनिक समारंभ व मुद्रण यावर अनेक बंधने होती. शिक्षणाचे माध्यम उर्दू. १७२४ ते १९४८ असे सव्वा दोनशे वर्षे आसफिया या घराण्याने हैदराबाद संस्थानावर निझामाने राज्य केले. संपत्ती व सत्ता यांचे प्रचंड आकर्षण आकर्षण असलेला मीर उस्मान अली खान अतिशय धर्मांध, हट्टी, जिद्दी होता त्याच्या कारकिर्दीत त्याने प्रजेवर अत्यंत बंधने घातले त्यामुळे प्रजेच्या मनात प्रचंड असंतोष होता सामाजिक परिषद आर्य समाजाने सुरू केलेली शुद्धीकरण मोहीम, गणेशोत्सव याद्वारे जनजागृतीचे कार्य सुरू झाले. ठिकठिकाणी व्यायाम शाळा स्थापन करणेए पाठशाळा उघडणे, वाचनालय चालविणे याद्वारे व जनजागणाच्या चळवळींद्वारे तसेच महाराष्ट्र परिषदेची विविध अधिवेशने स्टेट काँग्रेसचे कार्य या संघटनांद्वारे व विविध क्षेत्रात मोलाचे कार्य करणारे विविध क्रांतिकारक यांच्याद्वारे मराठवाड्याच्या मुक्तीसाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली जात होती.

➢ **स्वामी रामानंद तीर्थ :**

या सर्व क्रांतिकारक नेत्यांमध्ये स्वामी रामानंद तीर्थ यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल स्वामीजींच्या शांत संयमी नेतृत्वाखाली मराठवाड्यातील जनतेने निजामाच्या एकतंत्री, जुलमी, अत्याचारी राजवटी विरुद्ध लढा दिला. स्वामीजींनी तेलगु, कानडी, मराठी या तीनही भाषिक जनतेच्या मनावर राज्य केले. स्वामीजींसारख्या संन्यस्त वृत्तीचा नेता लाभल्यामुळेच हा लढा यशस्वी झाला महाराष्ट्र परिषदेच्या पहिल्या अधिवेशनास ते उपस्थित होते. १९३८ च्या लातूरच्या दुसऱ्या अधिवेशनात स्वामीजींनी मुक्ती संग्रामात पूर्णतः स्वतःला झोपून द्यावे असा निर्णय झाला पण ७ सप्टेंबर १९३८ ला स्टेट काँग्रेसचा जन्म होण्यापूर्वीच निझामाने काँग्रेसवर बंदी घातली. त्यासाठी २४ ऑक्टोबर १९३८ ला ही बंदी उठवावी व नागरी हक्क बहाल करावेत त्यासाठी सत्याग्रह झाला. २७ ऑक्टोबर १९३८ ला सत्याग्रहींच्या दुसऱ्या तुकडीचे नेतृत्व स्वामीजींनी केल्यामुळे त्यांना अटक झाली एप्रिल १९३९ ला त्यांची सुटका झाली पण परत १९४० साली वैयक्तिक सत्याग्रहात अटक होऊन १५ महिन्यांची शिक्षा झाली १९४२ साली तुरुंगवास घडला, १९४६ साली स्टेट काँग्रेसवरची बंदी उठविल्यानंतर पहिल्या अधिवेशनाचे ते अध्यक्ष झाले. १९४७ ला सत्याग्रह केला म्हणून त्यांना अटक झाली. स्वामीजींनी स्टेट काँग्रेसला निझामी राजवटीचे आसन नष्ट करण्यासाठी दमदार नेतृत्व दिले ७ ऑगस्ट हा दिवस 'हिंदी युनियन' म्हणून साजरा करावा व या दिवशी मोठ्या संख्येने हिंदी युनियनमध्ये सामील व्हावे तसेच स्वामीजींनी सांगितले की या दिवशी कामगारांनी काम थांबवावे विद्यार्थ्यांनी शाळा कॉलेजवर बहिष्कार टाकावा व हे सर्व अत्यंत संयमाने करावे. स्वामीजींच्या नेतृत्वाखाली जनशक्तीचे दर्शन घडून आले व हे १९४७ चे स्टेट काँग्रेसचे आंदोलन स्टेट काँग्रेसचे आंदोलन अधिकाधिक उग्र व व्यापक बनले व स्वामीजींच्या खंबीर शांत व्यक्तिमत्वामुळे, नेतृत्वामुळे त्याला एक दिशा मिळाली.

➢ **गोविंद भाई श्रॉफ:**

मराठवाड्यातील जनतेने राजकीय ज्ञानाने समृद्ध व्हावे व शैक्षणिक क्षेत्रात मराठवाड्यातील जनतेला शिक्षणाचा लाभ व्हावा या ध्येयाने प्रेरित होऊन गोविंद भाईंनी आपले जीवन या कार्यासाठी समर्पित केले. हैदराबाद मुक्ती लढ्यात गोविंद भाईंचे एक स्वातंत्र्य सैनिक म्हणून कार्य अप्रतिम मोलाचे आहे. म्हणजे हैदराबाद येथील निझामाची गुलामगिरी व इंग्रजांची गुलामगिरी अशा दोन्हीही गुलामगिरीतून मुक्ती मिळविण्याचे प्रयत्न मराठवाड्यातील जनता करीत होती. श्री गोविंद भाईंनी त्यागी वृत्ती व स्वातंत्र्याच्या प्रेरणेतून या मुक्ती लढ्यात मोलाचे कार्य केले त्या कार्याला इतिहासात तोड नाही.

१९३७ सालचे परतूरचे अधिवेशन व १९३८ साली हैदराबाद स्टेट कॉंग्रेसने सुरू केलेल्या पहिला सत्याग्रह गोविंद भाईंनीच संघटित केला त्यांच्या द्वारेच तो औरंगाबाद शहर व तालुक्यात पोहोचला भाईंजींच्या आदेशावरूनच सत्याग्रहाचे केंद्र पैठणला सुरू झाले. १९४८ पर्यंत भाईंनी या सत्याग्रहाचे नेतृत्व केले गोविंदभाईचे औरंगाबाद शहरातील वंदे मातरम् चळवळीतील त्यांचे योगदान मोठे आहे. औरंगाबाद येथील इंटरमीजिएट कॉलेजच्या मुलांच्या वसतीगृहात हिंदू मुलांनी दररोज सकाळी वंदे मातरम् गाण्यास सुरुवात केली. इत्तेहादी पुढाऱ्यांनी व काही जातीयवादी मुस्लिम व्यक्तींनी यास आक्षेप घेतला शेवटी याचे पर्यावसन वंदे मातरम संपात झाले. या संपात गोविंदभाईंनी तरुणांचे नेतृत्व केले तसेच या चळवळीतील विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक व पालक झाले नियमानुसार भाईंची चौकशी झाली परंतु या दरम्यान भाईंनी स्वतःच राजीनामा देऊन टाकला.

१९४६ साली स्वातंत्र्य दृष्टिक्षेपात आले असताना निजामाने संघर्षाचा पवित्र घेतला व संस्थानात एक लढा सुरू झाला. स्टेट कॉंग्रेसच्या कार्यकारिणीत गोविंद भाईंचा समावेश झाला. इत्तेहादुल -ए – मुसलमिन, रझाकार संघटना या दोन मुसलमान रझाकार संघटनांनी अत्यंत अत्याचार केले.

- **हुतात्मा वेद प्रकाश आर्य:**

हैदराबाद संस्थानात आर्य समाजाने लढलेला लढा हा लढलेला लढा हा एक दैदीप्यमान असा प्रसंग आहे. या लढ्यात दासमिया शिवबसप्पा हरके नावाचा तरुण शरीराचा कण न कण एक आवेशयुक्त व्यक्तिमत्व असा हरके आर्य समाजाच्या प्रचारास सिद्ध झाला.

*वैदिक नाद बजाओ द्य*
*ए आर्य वीर गण गाओ"*

असे गोड भजन आपल्या मधुरा आवाजात गात हा तरुण आसपासच्या खेड्यापाड्यातून प्रचारक म्हणून फिरू लागला. त्याच्या कर्तृत्वामुळे जनतेने त्याला वेद प्रकाश आर्य ही उपाधी बहाल केली. त्याला गोड गळा लाभला होता आणि हा गावेच्या गावे पाय तुडवीत आपल्या गोड गळ्याने भजने गात हिंडला. आपल्या राष्ट्रीय भजनाने आर्य पुत्राने अनेक लोक भारावून टाकले आणि आर्य समाजाच्या स्वातंत्र्य चळवळीचे गुंजोटीतील वेदगाण जणू उगमस्थान होते. गुंजोटी या दृष्टीने या चळवळीचे प्रथम केंद्र म्हणून मानांकित झाले.

भाई बन्सीलालजी वकील हे आर्य समाजाचे एक नेते होते ते गुंजोटी येथील कार्यक्रमास येतील असे जाहीर झाले. ज्या दिवशी हा कार्यक्रम ठरला तो दिवस होता २३ फेब्रुवारी फेब्रुवारी १९३७ चा. वेद प्रकाश आर्य बन्सीलाल यांना आणायला म्हणून उमरग्याला गेला.पण बन्सीलालजी मात्र ठरल्यावेळी ठरल्या गाडीने आले नाहीत. गुंजोटीतील कार्यकर्ते वाट बघून बघून दमले पण ते काही आले नाही. वाट बघून काही लोक शेवटी आपल्या घरी गेले. लोक परतले इतकेच निमित्त इत्तेहादुल मुसलमिनला पुरेसे होते. लोक गेलेले बघतात गावात गुंडांचे थैमान सुरू झाले. गावाचे वातावरण चिघळले. गावातील दरवाजे बंद होते गुंड संतापून गेले होते ते गावात हौदोस घालत होते. वेदप्रकाश मात्र संध्याकाळ झाली तरी भाईजींची वाट बघत बसस्टँड वरच होता. वेदप्रकाश भाईजी आले नाही म्हणून निराश झाला आणि एकटाच रस्त्याने चालला रस्ते इतके निर्मनुष्य होते की अंधारात वेदप्रकाश पुन्हा चालता झाला आणि एकाएकी अरब पठाण आणि इत्यादींचे गुंड हे आले कुठून त्याने आजूबाजूला जायला बघितले पण जातील तेथे त्याला गुंड आडवे झाला तसेच हे एक टोळके वेदप्रकाशच्या मागे लागले आणि क्षणार्धात त्याचे मुंडके कुण्या गुंडाने धडा वेगळे केले आणि गावंडी गल्लीत एका खड्ड्यात फेकून देण्यात आले. आर्य समाजाला या दंग्याने जाग आली आणि आता हत्यार बंद तरुणांच्या टोळ्या नक्की काय घडले याचा शोध घेत निघाल्या जाताना एक गस्तीपथक गवंडी गल्लीत आले आणि त्यांना रस्त्याच्या बाजूला एक मनुष्याकृती दिसली काहीजण तिकडे गेले तर त्यांना दिसले ते प्रकाशचे मुंडके ते बघून क्षणभर ते तरुण स्तब्ध झाले आणि त्यांनी सर्वांना आवाज दिला सगळेच जण प्रेताभोवती जमा झाले मनातून सर्वजण हळहळत होते पोलिसांना खबर मिळाली पाठोपाठ भाई बन्सीलालजी सुद्धा आले वीरभद्र आर्य आले आणि हैदराबाद संस्थाना एका आगळ्यावेगळ्या संस्कृतीचे निखळ दर्शन घडले.

- हुतात्मा गोविंदराव पानसरे :

हैदराबाद स्वातंत्र्य लढ्यात हुतात्म्यांच्या ज्या आहुती पडल्या त्यात गोविंदराव पानसरे यांचे हौतात्म्य हे अग्रणी होते. पानसरे हे कसलेले गांधीवादी कार्यकर्ते होते गांधीवादाचे आचरण शक्य तेवढे आपल्या जीवनात सार्थ करायचे आपल्याला पटले की त्यावर संपूर्ण विश्वास ठेवून ते कार्य करीत राहायचे असा त्यांचा स्वभाव होता. त्यावेळी स्टेट कॉंग्रेस महाराष्ट्र परिषद या नावाने कार्यरत होती त्या महाराष्ट्र परिषदेला लाभलेल्या अनेक नेत्यांपैकी

गोविंदराव पानसरेच्या रूपाने महाराष्ट्र परिषदेचा कार्यकर्ता विसाव्या शतकाच्या चौथ्या शतकात होता. पानसरे पूर्णवेळ कार्यकर्ते म्हणून मुधोळ व बिलोली हे दोन तालुके बघत. नांदेडमध्ये त्यावेळी महाराष्ट्र परिषदेचे आणखी पूर्णवेळ कार्यकर्ते होते नांदेड जिल्ह्याला असे कार्यकर्त्यांचे जणू मोठे मोहोळच लाभले होते. त्यामुळे काही ना काही प्रकरण हाताशी घेऊन राजकीय लढा लढला जात असे. कार्यकर्ते सतत अशा प्रकरणांचा पाठपुरावा करत व निजामी शासनाच्या नाकात दम आणत. नांदेड जिल्ह्यात यापूर्वी आर्य समाजाने बरेच काम केले असल्याने त्याचाही जनतेवरील परिणाम होता हैद्राबाद मुक्ती संग्रामातील काही संघर्ष हे अतिशय वैशिष्ट्यपूर्ण असे आहे व या संघर्षाचे स्वरूप जाणून घ्यायचे तर त्या वेळच्या जातीय क्रूर सरंजामी राजवटीच्या शिरस्त्यांची नीट ओळख असणेही जरुरी आहे. लेव्ही प्रकरण हे त्यातलेच एक आहे आणि खुश खरेदी विरुद्ध लोकमत जागृत करीत आणि शेतकरी परिषदा घेत कार्यकर्ते फिरत होते. अधिकारी ही लेव्ही वसुलीसाठी वाटेल त्या मार्गाने शेतकऱ्यांना त्रस्त करीत असत शासनही पानसरेंना अडकवायचेच असे धोरण ठामपणे चालू ठेवीत होते अशी एक शेतकरी परिषद कुंडलवाडी येथे झाली या शेतकरी परिषदेच्या निमित्ताने शासनाने जीवनराव बोधनकर आणि पानसरे यांना शांतता भंग करण, शांतता प्रिय शेतकऱ्यांना शासनाच्या विरुद्ध चितावणी देणे असले गुन्हे लादून हैदराबाद राज्य सुरक्षा कायद्याखाली अटक केली. जीवन रावांना जामीनावर सोडले पानसरेंना मात्र जामीन नाकारण्यात आला. आरोप परत घ्यावेत तरच त्यांना जामीनावर सोडण्यात येईल असा डाव कलेक्टरने टाकला. पानसरेंना जामीन होऊ देऊ नये असा त्यांचा डाव होता परंतु त्यांन जामिनावर सोडण्यात आले. आता त्यांना धर्माबादला जायचे होते बैलगाडीतून ते धर्माबाद ला निघाले. इकडे पानसरे जामीनावर सुटल्याची खबर मिळताच रझाकार या माथे फिरू संघटनेच्या मुसलमानांचे एक टोळके शस्त्रांसह बिलोलीकडे निघाले. बैलगाडी अर्धापूर पाशी आली असेल नसेल तोच या टोळक्याने बैलगाडी अडवली पानसरे मुर्दाबाद च्या घोषणा द्यायला सुरुवात झाली अल्लाहू अकबर, पाकिस्तान जिंदाबाद, पाकिस्तान जिंदाबाद या घोषणांचा गदारोळ सुरू झाला आपल्या ऐवजी इतर कार्यकर्ते संकट ओढून घेत आहे हे बघून ते ओरडले आणि त्या टोळक्याकडे बघून म्हणाले अरे तुम्हाला पानसरेंना मारायचे आहे ना मी आहे पानसरे. रजाकरांच्या डोळ्यात खून चढला होता आणि पानसरे ओरडले मला मारायचे ना मारा मीच पानसरे पण पानसऱ्यांचे पुढील शब्द कंठाबाहेर येण्यापूर्वीच तलवारीचे सपासप वार झाले आणि त्यांचे शीर त्यांच्या धडापासून वेगळे झाले. १९४६ च्या सप्टेंबरात पानसरेंचा खून झाला व पानसरे हुतात्मा झाले. या घटनेने नांदेड जिल्हा पेटून उठला अशाप्रकारे मराठवाडा मुक्ती संग्रामात विविध नेत्यांनी बलिदान दिल्यामुळे आज आपण स्वतंत्र मराठवाड्यात मुक्तपणे जगु शकतो या सर्व हैदराबाद मुक्ती लढ्याच्या होम कुंडातील समर्पित व्यक्तिमत्वामुळेच मराठवाडा स्वातंत्र झाला या सर्व हुतात्म्यांना त्रिवार वंदन.

**संदर्भग्रंथ सूची**


1. *हैद्राबाद मुक्तिलढ्यातील अग्निशिखा - दिगंबर कुलकर्णी, रेणुका प्रकाशन नागेश्वरवाडी औरंगाबाद. ऑगस्ट १९९७*
2. *हैद्राबादचा स्वातंत्र्यसंग्राम आणि मराठवाडा - अनंत भालेराव*
3. *हैद्राबाद स्वातंत्र्यसंग्राम - वसंत पोतदार*
4. *युगप्रवर्तक स्वामी रामानंद तीर्थ - प्रा. वि. पा. देऊळगावकर*
5. *संन्यस्त स्वातंत्र्य सेनानी पूज्य स्वामी रामानंद तीर्थ - डॉ. तारा परांजपे*
6. *हैद्राबाद मुक्तिसंग्राम - परभणी जिल्ह्याचे योगदान- विनायकराव चारठाणकर*
7. *मी पाहिलेला मुक्तिसंग्राम - ल. वि. चाकुरकर*